# सेवापूर्ती समारंभ

माहे एप्रिल, २००८ मध्ये सेवानिवृत्त झालेल्या ५४ सेवकांसाठी दिनांक ३०/४/०८ रोजी कॅ.वडके सभागृह येथे सेवापूर्ती समारंभ आयोजित करण्यात आला होता. या ५४ सेवकांपैकी वयपरत्वे ४४ व ऐच्छिक सेवानिवृत्त होणाऱ्या सेवकांची संख्या १० आहे. या सेवापूर्ती समारंभास अध्यक्ष म्हणून मा.रविंद्र धंगेकर, गटनेता, मनसे व प्रमुख पाहुणे म्हणून मा.जयंत पवार, व्यवस्थापक, मनपा मुद्रणालय हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री.अरुण खिलारी, कामगार कल्याणाधिकारी यांनी केले. प्रास्ताविकामध्ये उपस्थितांचे स्वागत करुन, सदर कार्यक्रम आयोजन करण्यामागची भूमिका विषद केली.



अध्यक्षीय भाषणामध्ये मा.रविंद्र धंगेकर यांनी कामगारांच्या सेवापूर्ती समारंभास मला अध्यक्ष म्हणून निमंत्रित केले त्याबद्दल संयोजकांचे आभार मानले. तसेच, महापालिकेची प्रदीर्घकाल सेवा करुन सेवानिवृत्त होणाऱ्या सर्व सेवकांनी आपले आर्थिक व शारिरीक आरोग्य राखणेसाठी करावयाच्या उपाययेजनांबाबत विस्ताराने मार्गदर्शन केले.

उपस्थित सेवानिवृत्तांना शाल, स्मृतिचिन्ह देवून मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. श्री.नंदकिशोर जगताप, सल्लागार (कामगार) यांनी आपल्या नर्मविनोदी शैलीत व काही सेवानिवृत्तांच्या प्रत्यक्ष अनुभवावर बहुमोल मार्गदर्शन केले. श्री.जयंत पवार, व्यवस्थापक, मामासाहेब दाते मुद्रणालय व पुणे मनपा सेवानिवृत्त संघाचे पदाधिकारी श्री.गोडबोले व श्री.नवले यांनीही या प्रसंगी सेवानिवृत्तांना यथोचित सल्ला दिला. बहुतांशी निवृत्त सेवकांच्या देय रकमा धनादेशाद्वारे या कार्यक्रमात आदा करण्यात आल्या. त्याबद्दल संबंधित लेखनिकांचे प्रसंगी कौतुक करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन श्री.जयवंत शिंदे यांनी केले.

**कल्याणवार्ता**
मे, २००८
❖ **प्रकाशक तथा अध्यक्ष** ❖
**कामगार कल्याण निधी**
**मा. प्रविणसिंह परदेशी**
आयुक्त, पुणे महापालिका
❖ **संपादक** ❖
मा. नंदकिशोर जगताप
सल्लागार (कामगार)
❖ **कार्यकारी संपादक** ❖
श्री.शिवाजी दौंडकर
कामगार कल्याण अधिकारी
❖ **सहाय्यक** ❖
सौ. ज्योती अ.भोसले
❖ **मुद्रक** ❖
मुद्रणमहर्षि मामाराव दाते
मुद्रणालय, मनपा, पुणे.
❖ **प्रकाशन स्थळ** ❖
पुणे महापालिका
शिवाजीनगर, पुणे ४११ ००५
या अंकात प्रसिध्द झालेल्या मतांशी प्रकाशक, संपादक, कार्यकारी संपादक व पुणे महापालिका सहमत असतीलच असे नाही.
❖ **संपर्क** ❖
सल्लागार (कामगार) कार्यालय, पुणे महानगरपालिका.
दूरध्वनी क्र. २५५० १२५५/१२५२/१२५३
ईमेल आयडी
nandkumar.jagtap
@punecorporation.org
**फक्त खाजगी वितरणासाठी**
(विनामूल्य)

# सांस्कृतिक कार्यक्रम व नाटक

दिनांक १ मे या कामगार दिनी गुणवंत कामगार पुरस्कार प्रदान सोहळ्यापूर्वी कामगार कल्याण निधीमार्फत डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन येथे सेवकांच्या मुलांसाठी विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमामध्ये २५ सेवकांच्या मुलांनी सहभाग घेतला होता.



या कार्यक्रमात सेवकांच्या मुलांनी मराठी, हिंदी गाणे, नृत्य, संवाद, इत्यादीद्वारे आपली अभिनय कला दाखवून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. या संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन आणि संचालन श्री. अरविंद कुबडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी उत्कृष्टपणे केले. याशिवाय कामगार कल्याण निधीमार्फत दिनांक ४/५/२००८ रोजी महापालिका सेवकांनी बसविलेले शेजाऱ्यावर प्रेम करावे हे नाटक बालगंधर्व रंगमंदीर येथे सादर करण्यात आले. या नाटकातून महापालिका सेवकांनी त्यांच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना वाव दिल्यास त्यांच्यातील कार्यक्षमता निश्चित वाढीस लागते हे सिध्द केले. या नाटकासाठी श्री.मंगलदास माने व त्यांच्या सहकाऱ्यांनी अविरत श्रम घेवून व पूर्व तयारी करुन दर्जेदार अभिनयाद्वारे समर्थपणे नाटक सादर केले. सर्व सहभागी कलाकार व त्यांच्या चमूचे हार्दिक अभिनंदन.

# मनपा परिचारिकांचा फ्लोरेन्स नाईटिंगेल दिनानिमित्त हृद्य सत्कार

दिनांक १२ मे, २००८ रोजी फ्लोरेन्स नाइटिंगेल दिनानिमित्त इंडियन मेडिकल असोसिएशन, पुणे शाखा यांचेतर्फे कमला नेहरु रुग्णालयाच्या सभागृहामध्ये आयोजित केलेल्या विशेष कार्यक्रमात पुणे मनपा सेवेतील परिचारिका श्रीमती





वसुधा भंडारे, सिनिअर नर्स व श्रीमती शैलजा रणभिसे, ज्युनिअर नर्स यांचा स्मृतीचिन्ह व पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला. इंडियन मेडिकल असोसिएशन, पुणे शाखा यांचेतर्फे दरवर्षी परिचारिकांना गौरविण्यात येते. या वर्षी तीन परिचारिकांची विशेष निवड समितीकडून निवड करण्यात आली होती. यामध्ये महापालिकेच्या दवाखान्यामध्ये काम करणाऱ्या दोन सेविकांचा समावेश आहे. निवड समितीने लावलेल्या निकषांमध्ये वक्तशीरपणा, उत्कृष्ट रुग्णसेवा, गणवेष, वरिष्ठांशी व कनिष्ठांशी संबंध, रुग्णांशी वर्तणूक, कामातील नियमितता, इत्यादी बाबींचा विचार करण्यात आला. श्रीमती शैलजा रणभिसे या डॉ. होमी भाभा दवाखाना येथे कार्यरत आहेत तर श्रीमती वसुधा भंडारे या कमला नेहरु रुग्णालय येथे कार्यरत आहेत. श्रीमती वसुधा भंडारे या उच्च शिक्षित असून, सेवेत असताना त्यांनी बी.ए., एम.ए., एम.फिल., होमिओपथक प्रमाणपत्र अभ्यासक्रम, इत्यादी पदव्या प्राप्त केल्या आहेत. या सेविकांना मिळालेल्या बहुमानाबद्दल त्यांचे महापालिका वर्तुळात विशेष अभिनंदन होत आहे.

फ्लोरेन्स नाईटिंगल दिनानिमित्त आयोजित सत्कार समारंभास पुणे मनपा कामगार युनियनच्या जनरल सेक्रेटरी मा.मुक्ता मनोहर, नगरसेवक मा.गणेश बिडकर, इंडियन मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.अविनाश भोंडवे, कमला नेहरु रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ.फ्रान्सिस, इतर वैद्यकीय अधिकारी व पॅरामेडिकल स्टाफ उपस्थित होते. या कार्यक्रमात 'वेळेचे महत्व' व आरोग्य या विषयावर डॉ.शिरीष पटवर्धन यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

# ॲड मंजुषा इधाटे यांचे यश



ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट या संस्थेतर्फे माहे जानेवारी, २००८ मध्ये अखिल भारतीय स्तरावर एल.जी.एस.परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. या परीक्षेमध्ये महापालिकेच्या म्युनिसिपल प्रॉसिक्युटर ॲड. मंजुषा इधाटे या संपूर्ण केंद्रामधून तिसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाल्या आहेत. सौ. इधाटे या उच्च शिक्षित असून, त्यांनी अनेक परीक्षांमधून विशेष प्राविण्य प्राप्त केले आहे. सौ. इधाटे यांच्या या यशाबद्दल त्यांचे कामगार कल्याण निधीमार्फत हार्दिक अभिनंदन.